# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०-२५६३०२३५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


454

**कार्यालयीन परिपत्रक क्र. १६०**

जा.क्र. झोपुप्रा/ताबा/परिपत्रक/१५९/२०१५
दिनांक : २८/०५/२०१५.

**विषय :-** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पुनर्वसन इमारीतीतील सदनिकांचे सोडत (लॉटरी) बाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील संस्थेच्या पुनर्वसन इमारतीत उपलब्ध असलेल्या निवासी, निवासी/ अनिवासी (उपलब्ध असल्यास) सदनिकांचे वाटप प्राधिकरणातील ताबा विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचे उपस्थितीत सोडतीने व्हिडीओ चित्रीकरणात करण्यात यावे. सदनिकांचे वाटप बाबत कार्यवाही करताना प्राधिकरणाकडून खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.

१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत तांत्रिक विभागाकडून Commencement Certificate (बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र) प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर म्हणजेच पुनर्वसन इमारतीमधील पुनर्वसन घटकांसाठी या सदनिकांची संख्या निश्चित झालेनंतर सदनिकांचे लॉटरी पद्धतीने निश्चितीकरण करणेत यावे.

२) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस झोपडीधारकांचा विरोध असताना निष्कासनाची कार्यवाही करणे आवश्यक असेल या परिस्थितीत विरोधक झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीमध्ये सदनिकेचा निश्चित तपशील देणे एस.आर. ६ (VI) (b) नुसार आवश्यक असलेने लॉटरी पद्धतीने सदनिकांचे वितरण निष्कासनाचे कार्यवाही पूर्वी करणे आवश्यक राहील.

३) सदनिकांचे वाटपास परवानगी घेताना संस्था / विकसक यांचेकडून संस्थेचे अध्यक्ष, सचिव व योजनेचे विकसक यांच्या स्वाक्षरीनिशी पात्र झोपडीधारकांची फोटो यादी, मंजूर परिशिष्ट-२ चा झेरॉक्स प्रत, इमारतीचा नकाशाची प्रत इत्यादीसह सादर करणे आवश्यक राहील.

४) परिशिष्ट-२ ची जोडपत्रासह मंजुर प्रत सक्षम प्राधिकारी विभागाने (पुरवणी परिशिष्टासह) ताबा विभागास द्यावी.

५) सदनिकांचे सोडतीची व्यवस्था संस्था/विकसक यांनी करावी.

६) लॉटरी पद्धतीने सदनिकांचे वितरण करताना व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे. व्हिडीओ चित्रीकरणाचा खर्च संस्था/विकसक यांनी करावा.

७) लॉटरी पद्धतीने सदनिकांचे वितरण करताना दि.११/०९/२०१४ रोजीच्या शासन नियमावलीतील एस.आर.६ (IV) तरतुदीनुसार अंध, अपंग, विधवा महिला कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे यांना

प्राधान्य म्हणून त्यांची स्वतःची विनंती असल्यास खालच्या मजल्यावरील सदनिकांचे लॉटरी पद्धतीने वितरण करण्यात येईल.

८) लॉटरीने पद्धतीने सदनिकांचे वितरण करताना जे पात्र झोपडीधारक उपस्थित आहेत त्यांना लॉटरीने वाटप केल्यानंतर जे पात्र झोपडीधारक उपस्थित झाले नाहीत, त्यांच्या सदनिकांचे वाटप उपस्थित असलेले संस्था/विकसक प्रतिनिधी यांचे उपस्थितीत करणेत येईल व त्यानुसार उर्वरित चिठ्ठयांचे क्रमांक त्यांचे नावाचे समोर दर्शविण्यात येईल. त्यामुळे अनुपस्थित झोपडीधारकानांही त्याच दिवशी सदनिकांचे वाटप झाल्याचे गृहीत धरण्यात येईल.

९) सदनिकांची चिठ्ठी काढतांना पात्र झोपडीधारक काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहू शकले नाहीत तर त्यांनी त्याचे पती/ पत्नी, मुलगा, मुलगी यांना सदनिकांची सोडतीने चिठ्ठी काढण्यास परवानगी देणेत येत आहे. परंतु सदनिकेची चावी व ताबा घेताना पात्र झोपडीधारक स्वतः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

१०) तांत्रिक विभागाने इमारतीला अंतिम भोगवटा पत्र (Occupation Certificate ) ताबा विभागाने सदनिका वाटपाबाबतचा अहवाल दिल्यानंतरच द्यावे.

११) Occupation Certificate दिल्यानंतर मंजूर वाटप प्रमाणपत्राप्रमाणे सदनिकेचा ताबा (Possession) व ताबा पत्र (Possession letter) संस्था/विकसकाने पात्र झोपडीधारकांना द्यावे

वरील निर्देशाचे अवलंब सदनिकांचे वितरण बाबत कार्यवाही करतांना आवश्यक राहील

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :-

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा.,पुणे.
३. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकरी, झो.पु.प्रा. पुणे
४. सहाय्यक संचालक, नगर रचना, झो.पु.प्रा.,पुणे
५. नगर रचनाकार, झो.पु.प्रा. पुणे
६. तहसिलदार, (श्रीमती. वाघमारे/ श्रीमती. गायकवाड/ श्रीमती. बारटक्के)
७. उप अभियंता (श्री. साळुंखे/ श्री. शिंत्रे/ श्रीमती. वाणी)
८. शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता, (श्री. पिंपळखुंटे/ श्री. नाईक/ श्री. जतकर)



E:\Sachin\Taba\Karyalayin Paripatrak.doc